महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस-सिंधुदुर्गनगरी**
मुख्य प्रशासकिय इमारत, 'सी' विंग, दालन क्र. ३१२
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्गनगरी पीन-४१६८१२

दूरध्वनी क्र. : ०२३६२-२२८७१७
Email ID : eemido@gmail.com

**जा.क्र. लपाविओ/प्रशा-४/३२३७/२०२१** **दिनांक :-३० /११/२०२१.**

प्रति,

मा. उप वनसंरक्षक,
सावंतवाडी.

**विषय:-** **निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**
या प्रकल्पाच्या वनजमिनीसाठी पर्यायी जमिन उपलब्ध करणेबाबत.

**संदर्भ:-**
१. कार्यकारी अभियंता, तिलारी शिर्ष कामे विभाग क्र. १, कोनाळकट्टा यांचे पत्र क्र तिशिकावि-१/प्रशा/का-१९/१४२१, दिनांक १२/०५/२०१५.
२. सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे पत्र क्र. सिंपाप्रबांवि/ प्रशा-५/१९३६/सन २०२०, दि.१०/०७/२०२०.
३. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांचे पत्र क्र. भूसंपादन/निरुखे-१/प्र. क्र. ७-२०१९/२०२०-२१, दि. ०८/०१/२०२१.
४. मा. मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांची दिनांक ३०/१०/२०२१ रोजीची सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांची आढावा बैठक.
५. सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे पत्र क्र. सिंपाप्रबांवि/ प्रशा-५/३५६७/सन २०२१, दि.२४/११/२०२१.

उपरोक्त विषयान्वये संदर्भिय पत्र क्र. २ अनुसार तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील केंद्रे-खुर्द व केंद्रे-बुद्रुक, ता. दोडामार्ग येथील विनावापर असलेल्या एकूण ७८.६९.५० हे. आर. जमिनीपैकी ३४.१३.५० हे. आर. जमिन नरडवे प्रकल्पाच्या पर्यायी जमिनीकरिता, तसेच २८.०५.०० हे. आर. व १.२१.०० हे. आर. जमिन अनुक्रमे निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प व देंदोनवाडी ल. पा. प्रकल्पाच्या वनसंज्ञाक्षेत्रासाठी सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे आपले हस्तांतरीत करणेबाबत कार्यवाही करण्यात आली होती. परंतु वनक्षेत्रपाल, कडावल यांनी मागणी केल्यानुसार भूसंपादन प्रस्ताव क्र. ०७/२०१९ निरुखे नुसार बाधित होणा-या सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर निहाय वन व खाजगी क्षेत्राची भूमी अभिलेख कार्यालयाकडून दिनांक ०६/०२/२०२० ते २७/०३/२०२० या कालावधीत मोजणी करण्यात आली. त्यानुसार एकूण वनक्षेत्र १८.९४.०० हे. आर. बाधित होत असल्याचे निर्दशनास आले.

मा. मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांच्या दिनांक ३०/१०/२०२१ रोजीच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या आढावा बैठकीमध्ये मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस-सिंधुदुर्गनगरी यांची निरुखे वनसंज्ञा क्षेत्र वळतीकरणासंबंधी आपलेशी चर्चा झाली आहे. त्यात निरुखे प्रकल्पासाठी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांनी मोजणी अंती आवश्यक वनक्षेत्र १८.९४.०० हे. आर. संपादित होत असल्याचे आपले कार्यालयाचे अधिनस्त वनक्षेत्रपाल, कडावल यांना संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये कळविले होते. त्यानुसार जलसंपदा विभागाने २८.०५.०० हे. आर. क्षेत्राचे ना-हरकत प्रमाणपत्र दुरुस्त करुन आवश्यक १८.९४.०० हे. आर. क्षेत्राचे ना-हरकत प्रमाणपत्र जलसंपदा विभागाने सादर करावे असे मा. अधीक्षक अभियंता यांना आपले चर्चेत आपण सांगितले आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र. ५ अन्वये निरुखे प्रकल्पाच्या वनक्षेत्र वळतीकरणासाठी नव्याने सुधारीत १८.९४.०० हे. आर. क्षेत्राचे वळतीकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे विभागाकडून प्राप्त झाले आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र व प्रस्ताव आपले कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

हे आपले माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत —ना-हरकत प्रमाणपत्र

01.12.2021

बारनिशी लिपिक
उपवनसंरक्षक कार्यालय
वनविभाग सावंतवाडी

*'स्थळप्रत का. अ. यांना मान्य.'*

(सं. ग. लिखारे)
उपकार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
ओरोस, सिंधुदुर्गनगरी.

प्रत- मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस-सिंधुदुर्गनगरी यांना माहितीसाठी सविनय सादर. (सोबत- वरीलप्रमाणे)
प्रत- जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित. (सोबत- वरीलप्रमाणे)
प्रत- उपअधीक्षक, भूमी अभिलेख, ता. दोडामार्ग यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी. (सोबत- वरीलप्रमाणे)
प्रत- उपविभागीय अभियंता, पाटबंधारे बांधकाम उपविभाग क्र. १, कणकवली यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना. (सोबत- वरीलप्रमाणे)

C:\Users\mid\Downloads\0112.docx3

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

•जलसंपदा विभाग•

कार्यकारी अभियंता

सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चराठे-सावंतवाडी यांचे कार्यालय

•"जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या

:https://wrd.maharashtra.gov.in"•

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ

•मु.पो.चराठे-सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग-४१६५१०•दूरध्वनी:०२३६३/२७२२१३•ई-मेल:eesipcd१७@gmail.com•

जा.क्र.सिंपाप्रबांवि/प्रशा-५/३५६७/सन २०२१ | दिनांक :२८/११/२०२१

प्रति,

कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग,
ओरोस – सिंधुदुर्गनगरी.

**विषय :- ल.पा.योजना निरूखे, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग वनजमिनीसाठी पर्यायी जमीन उपलब्ध करणेबाबत.**

संदर्भ :-
१. मा.मंत्री ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांची दि.३०.१०.२०२१ रोजीची सिंधुदुर्ग जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पांची आढावा बैठक.
२. आपले कार्यालयीन पत्र जा.क्र.लपाविओ / प्रशा-४ / ३२७१ /२०२१ दि.१२.११.२०२१.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. सिंपाप्रबांवि/प्रशा-५/१९३६/२०२० दि.१०.०७.२०२०

तिलारी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रावरील केंद्रे खु. व केंद्रे बु. दोडामार्ग या गावांचा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रामुळे संपर्क तुटल्यामुळे त्यांचे विजघर येथे खास बाब म्हणून पुनर्वसन करणेत आले. याकरीता केंद्रे येथील एकूण ७८.५९.५० हे. जमीन संपादित करणेत आलेली असून ती कार्यकारी अभियंता, तिलारी शीर्षकामे विभाग क्र.१. कोनाळकट्टा यांचे नावे ७/१२ सदरी दाखल आहे.

जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दि.२७.०१.२०१६ अन्वये कार्यकारी अभियंता, तिलारी शीर्षकामे विभाग क्र. १, कोनाळकट्टा हा विभाग बंद करणेत आला असून या विभागाचा सर्व कार्यभार कार्यकारी अभियंता, तिलारी कालवा विभाग क्र. १ , चराठे - सावंतवाडी यांचेकडे वर्ग झालेला आहे. तद्नंतर शासन निर्णय दि. ०७/०३/२०१७ नुसार कार्यकारी अभियंता, तिलारी कालवा विभाग क्र. १ चराठे - सावंतवाडी या विभागाच्या नावात बदल होऊन कार्यकारी अभियंता, सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चराठे -सावंतवाडी असा करण्यात आलेला आहे. केंद्रे येथील विनावापर असलेल्या एकूण ७८.५९.५० हे. जमिनीपैकी ३४.१३.५० हे. जमीन वनविभाग. मा. जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाच्या सहमतीने नरडवे ( महंमदवाडी) प्रकल्पाच्या पर्यायी वनजमिनीकरिता लघुपाटबंधारे विभागामार्फत वनविभागाकडे हस्तांतरित करणेत आली असून ४४.४६.०० हे. जमीन शिल्लक आहे. सद्यस्थितीत, शासनाची ही जागा विनावापर पडून आहे.

मोजे निरुखे, ता. कुडाळ प्रकल्पाकरिता या विभागाकडील मोजे केंद्रे येथील २८.०५.०० हे. क्षेत्र आवश्यक असल्याने पर्यायी वनजमीन म्हणून आपले कार्यालयामार्फत वन विभागाकडे हस्तांतरित करणेस उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये कळविणेत आले होते .सदर २८.०५.०० हे. क्षेत्रापैकी १८.९४.०० हे क्षेत्राची आवश्यक असल्याने पर्यायी वनजमीन म्हणून आपले कार्यालयामार्फत वन विभागाकडे हस्तांतरित करणेस उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तरी, मा.मंत्री महोदय ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांनी मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस - सिंधुदुर्गनगरी यांना दिलेल्या सुचनेनुसारचा प्रस्ताव प्रतिस्वाक्षरी करून आपणाकडे पाठविणेत येत आहे. तसेच याकरिता असलेल्या संपादन खर्चाची रक्कम रू.५४.७० लक्ष या विभागाकडे वर्ग करणेत यावी.

हे आपले माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

( रो. रा. कोरे )
कार्यकारी अभियंता
सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग
चराठे - सावंतवाडी

**प्रत :-** मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस – सिंधुदुर्गनगरी यांना माहितीसाठीसविनय सादर.

Scanned with CamScanner

**तिलारी प्रकल्पांतर्गत केंद्रे खुर्द व केंद्रे बुद्रुक येथील संपादीत केलेली जमीन निरुखे प्रकल्पासाठी वन पर्यायी वनीकरणाकरीता (Alternative Land) हस्तांतरीत करावयाचा प्रस्ताव,**

विषय :- निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग प्रकल्पातंर्गत बुडीत क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या १८.९४.०० हे वने व खाजगी वनसंज्ञा जमिनीच्या मोबदल्यात मोजे केंद्रे बुद्रुक येथील जलसंपदा विभागाच्या ताब्यातील वन विभागास पर्यायी वनीकरणाकरीता (Alternative Land) हस्तांतरीत करणेबाबत....

संदर्भ :- १. मा.मंत्री ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांची दि.३०.१०.२०२१ रोजीची सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांची आढावा बैठक.

२. आपले कार्यालयीन पत्र जा.क्र.लपाविओ/प्रशा-४/३२७१/२०२१ दि.१२.११.२०२१.

३. मा. अधीक्षक अभियंता दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ ओरोस सिंधुदुर्गनगरी यांचे पत्र क्र.जा.क्र. दकोंपाप्रम/प्रशा-३/१३९९/२०२० दि.०३.०७.२०२०.

४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. सिंपाप्रबांवि/प्रशा-५/१९३६/२०२० दि.१०.०७.२०२०.

तिलारी प्रकल्पातंर्गत मोजे केंद्रे खुर्द येथील ३१.५६.५० हे. व केंद्रे बुद्रुक येथील ४७.०३.०० (३८.५९.८०+ ८.४३.२० हे.) अशी मिळून एकुण ७८.५९.५० हे. जमीन तिलारी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रावरील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत करण्यात आली व त्यांचे विस्थापन हेवाळे बोजघर वसाहत येथे करण्यात आले आहे. सद्यस्थितीत त्यापैकी ३४.१३.५० हे क्षेत्र नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी वन विभागास पर्यायी वनीकरणाकरीता हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच १.२१ हे. क्षेत्र लघु पाटबंधारे योजना देंदोनवाडी ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग प्रकल्पासाठी वन विभागास पर्यायी वनीकरणाकरीता हस्तांतरीत करण्यासाठी प्रस्तावित आहे. उर्वरीत क्षेत्राचा वापर करण्यात येत नाही.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.४ अन्वये , मोजे केंद्रे खुर्द व केंद्रे बुद्रुक येथील एकुण ७८.५९.५० हे. जमिनीपैकी २८.०५.०० हे. क्षेत्र आपले कार्यालयास हस्तांतरित करणेत आले होते. तरी, निरूखे वनसंज्ञा क्षेत्र वळतीकरणासंबंधी झालेल्या चर्चेनुसार निरुखे प्रकल्पासाठी उपअधिक्षक, भुमी अभिलेख , कुडाळ यांनी मोजणी अंती आवश्यक क्षेत्र १८.९४.०० हे.आर संपादित होत असल्याने निरूखे प्रकल्पाच्या वनक्षेत्र वळतीकरणासाठी नव्याने सुधारीत १८.९४.०० हे. आर. क्षेत्र हस्तांतरित करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आली .

केंद्रे बुद्रुक येथील सदरच्या जमिनीचे ७/१२ उताऱ्यानुसार जमिन कार्यकारी अभियंता, तिलारी शिर्षकामे विभाग क्र. १ कोनाळकट्टा जलसंपदा विभागाच्या नावे आहे व जमीन शासकीय आहे.सद्यस्थितीत शासन निर्णय २७/०१/२०१६ नुसार कार्यकारी अभियंता, तिलारी शीर्षकामे विभाग क्र.१, कोनाळकट्टा हा विभाग बंद करण्यात आला असून या विभागाचा सर्व कार्यभार कार्यकारी अभियंता, तिलारी कालवा क्र.१ चराठे सावंतवाडी यांचेकडे वर्ग झालेला आहे.तद्नंतर शासन निर्णय दि. ०७/०३/२०१७ नुसार कार्यकारी अभियंता, तिलारी कालवा विभाग क्र. १ चराठे सावंतवाडी या विभागाच्या नावात बदल होऊन कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चराठे -सावंतवाडी असा करण्यात आलेला आहे.

केंद्रे बुद्रुक येथील संपादीत जमिनीचे क.जा.प. होऊन संपादीत जमिनीला एकत्रित सर्व्हे नं. प्राप्त झालेला आहे. संपादीत जमिन व निरुखे प्रकल्पासाठी हस्तांतरीत करावयाची जमिन याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | क.जा.प.. नंतरचा सर्व्हे नं. | संपादित क्षेत्र हे. | नरडवे प्रकल्पासाठी हस्तांतरीत झालेले क्षेत्र हे. | देंदोनवाडी प्रकल्पासाठी हस्तांतरीत करावयाचे प्रस्तावित क्षेत्र हे. | निरुखे प्रकल्पासाठी हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र हे. | उर्वरीत क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रे खुर्द | १/ब | ३१.५६.५० | ३१.५६.५० | -- | -- | -- |
| २ | केंद्रे बुद्रुक | २३/१ | ३८.५९.८० | २.५७.०० | १.२१.०० | १८.९४.०० | १५.८७.८० |
| ३ | केंद्रे बुद्रुक | ४/अ | ८.४३.२० | -- | -- | -- | ८.४३.२० |

Scanned with CamScanner

वरील तक्त्यानुसार केंद्र खुर्द व केंद्र बुद्रुक येथील तिलारी प्रकल्पासाठी संपादन झालेल्या २८.०५.०० हे. जमिनीपैकी तिलारी प्रकल्पाच्या पर्यायी वनीकरणासाठी नव्याने प्रस्तावित १८.९४.०० हे. क्षेत्र वनविभागास हस्तांतरित करण्यात येत असून उर्वरित ९.११.०० हे. क्षेत्र हे तिलारी प्रकल्पाच्या मालकीचे राहील.

| | |
|---|---|
| ताब्यात देणार | ताब्यात घेणार |
| कार्यकारी अभियंता | उप वनसंरक्षक |
| सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग | सावंतवाडी |
| चराठे - सावंतवाडी | |

Scanned with CamScanner